फिन मॅकूल

आयर्लंडमधील लोककथा

लेखक: **सॅम मॅकब्रॅटनी**

चित्रे व सजावट: **ग्रॅम फिलपॉट**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**



फिन मॅकूल


आयर्लंडमधील लोककथा


लेखक: **सॅम मॅकब्रॅटनी**

चित्रे व सजावट: **ग्रॅम फिलपॉट**

अनुवाद: **सुजाता गोडबोले**









खूप वर्षांपूर्वी स्कॉटलंडमध्ये बॅल्फोर नावाचा एक राक्षस राहत होता...

आणि आयर्लंडमध्ये फिन मॅकूल नावाचा एक राक्षस राहत होता.





एकदा बॅल्फोर हा स्कॉटलंडमधील राक्षस

फिन मॅकूल या आयर्लंडमधील राक्षसाला ओरडून म्हणाला,

“ फिन मॅकूल! फिन मॅकूल!


मी आता तुला पकडणार आहे!”



फिन मॅकूलला बॅल्फोरची खूप भीती वाटत होती.




“आता मला पळूनच जायला हवे,” तो म्हणाला.




पण फिनची बायको मेरी म्हणाली,

“पण तो तू परत येईपर्यंत वाट पाहिल!



लहान बाळासारखा वागू नकोस!”



पण असं म्हटल्यावर तिला एक कल्पना सुचली.

ती फिनला म्हणाली, “यात चढून बस!”

“पण कशासाठी?” फिनने विचारले.

“मी सांगते तसे कर,” मेरी म्हणाली.



आणि मग...

धाड! धाड! धाड!



तो बॅल्फोरच्या पावलांचा आवाज होता!




त्या दिवशी मेरीने खूप पाव केले होते.

त्यातल्या काहींमध्ये तिने एक चमचा ठेवला.



“तू हे काय करते आहेस?” फिनने विचारले.

“आता पहा काय होते!” मेरीने उत्तर दिले.



धाड! धाड!

“फिन मॅकूल!” बॅल्फोर ओरडला.

“फिन आता लवकरच परत येईल,” मेरी म्हणाली.



“तुला हवे तर तो येईपर्यंत तू इथेच थांब.

तोपर्यंत मी केलेला हा पाव घे,”

मग तिने चमचा घातलेला

एक पाव त्याला दिला.



बॅल्फोरने पावाचा एक घास घेतला.



“ओय! ओय!” तो ओरडू लागला.




“काय झालं?” मेरीने विचारले.

“माझ्या बाळाला तर हा पाव खूप आवडतो!”

मग तिने फिनला एक पाव दिला,


आणि त्याने तो एका घासात संपवला!



“हे बाळ तर फारच शक्तिवान दिसते!” बॅल्फोर म्हणाला.

मग फिनने बॅल्फोरचे नाक पकडले!

“ओय! ओय!” बॅल्फोर ओरडू लागला.



“त्याचे बाबा आता इतक्यात येतीलच,

तुझे त्यांच्याकडे काय काम होते?” मेरीने विचारले.




त्याचे बाबा?... अं... अं...



“काम काही फार महत्त्वाचे नाही,

मला आता जायला हवे!” बॅल्फोर म्हणाला.

आणि तो पळून गेला!



“अरे बापरे! हे बाळ तर फारच शक्तिवान होते,

म्हणजे त्याचे बाबा तर...!” बॅल्फोर आपल्याशीच म्हणाला.



मग बॅल्फोर कधीच परत आला नाही.



मग फिन, मेरी आणि त्यांचे बाळ

अगदी आनंदात राहू लागले.